ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 7 | MARCH - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# “देवगड तालुक्यातील मासेमारी समस्या”



श्री.स.ह.केळकर
महाविद्यालय,देवगड जि.सिंधुदुर्ग.
प्राध्यापक हितेश दिपक शेडगे

## प्रस्तावना

सिंधुदुर्ग जिल्हातील देवगड तालुका हा मासेमारी, आंबा या दोन व्यावसामध्ये प्रामुख्याने प्रसिद्ध आहे यामध्ये मासेमारी हा एक महत्वाचा व्यवसाय करतात. देवगड तालुक्यात होणारा मासेमारी व्यवसाय. हा विशेष करून खाडी आणि समुद्रात केला जातो. यामध्ये पारंपारिक आणि आधुनिक पद्धतीचा अवलंब केला जातो. पारंपारिक पद्धतीमध्ये रापण व्यवसाय, गिलनेटर्स, जाळी लावणे. या प्रकारचा मत्सव्यवसाय होतो टर आधुनिक पद्धतीमध्ये मोठमोठ्या ट्रोलर्सच्या माध्यमातून मासेमारी केली जाते. मासेमारी व्यवसायात अनेक स्वरूपाच्या समस्या आहेत. या समस्यांना सातत्याने मच्छिमार बांधवाना सामोरे जावे लागते.

या समस्येवर मात करण्यासाठी मच्छिमार बांधव आपला व्यवसाय उत्तम पद्धतीने करण्याचा प्रयत्न करत असतात. बऱ्याच वेळा निसर्गाची साथ मिळत नाही किवा निसर्गाच्या अवकृपेला सुद्धा सामोरे जावे लागते. या संदर्भात प्रस्तुत विधार्थीने किवा संशोधकाने देवगड तालुक्यातील गाव अभ्यासासाठी निवडून या गावातील मासेमारी बांधवांच्या समस्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न करून,त्याआधारे हा शोधनिबंध पूर्ण केला आहे.

## मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण

### प्रास्ताविक :-

### मस्त्य व्यवसायाचा इतिहास

प्रागैतिहासिक काळात मासेमारी हा अन्नाचा एक आवश्यक स्त्रोत होता. आणि पुरातन काळात तो एक व्यावसायिक व्यवसाय बनला. खोल समुद्रात मासेमारी पाहिल्यानदा १५ व्या शतकात उदयास आली. परंतु १९ व्या शतकात स्टीम बोटींच्या आगमनाने आणखीन वाढली. अधिक शक्तिशाली ट्रोलर्स मोठे जाळे ओढु शकतात. १८ व्या शतकात श्रीमंत वर्गासाठी राखीव असलेली मनोरंजक मासेमारी अधिक सुलभ झाली कारण तांत्रिक प्रगतीमुळे कमी खर्चात चागली उपकरणे तयार करणे शक्य झाले.

पुरातत्वीय उत्खननात सापडलेल्या माशांच्या जीवाश्मावरून असे दिसून येते कि, सुमारे ५ लाख वर्षापूर्वी होमो हबिलीस नंतर होमो इरेक्टस हे पहिले मच्छिमार होते. तथापि ४०,००० वर्षापूर्वीच्या अप्पर प्लेओलीठीक काळात होमो सेपीयन्सच्या आगमनानंतरच मासेमारीचा खरोखर विकास झाला असावा.

वेगवेगळ्या मासेमारी पद्धतीबद्दल फार कमी माहिती आहे. त्या वेळी निर्वाह मासेमारी म्हणजे हाताने किवा नैसर्गिक साहित्यापासून बनविलेल्या प्राथमिक साधनांचा वापर करून मासे पकडले जात असत. हे प्रामुख्याने तलाव आणि नद्यांजवळ स्थायिक झालेले लोक अशा पद्धतीने मासेमारी करत असत.
१५ व्या शतकात ग्रेट ब्रिटनमध्ये पहिले ट्रोलर दिसू लागले परंतु १९ व्या शतकात जेव्हा पालांची जागा वाफेच्या शक्तीने घेतली तेव्हा ट्रोलिंगाच्या विस्तार झपाट्याने झाला. बोटी मोठ्या आणि अधिक शक्तिशाली झाल्या, ज्यामुळे त्यांना खोल पाण्यात रुंद जाळे ओढता आले. समुद्री खाद्यपदार्थांचा व्यापार वाढला.

## संशोधन पद्धती

या प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर करून त्याआधारे माहिती संकलित केलेली आहे.

### गृहीतकृत्य :-

१. देवगड तालुक्यातील मासेमारी ही प्रामुख्याने खडी आणि समुद्रामध्ये चालते.
२. देवगड तालुक्या मध्ये पारंपारिक आणि आधुनिक या दोन्ही स्वरुपाची मासेमारी केली जाते. पारंपारिक मासेमारीमध्ये रापण व्यवसाय आणि खाडीतील मासेमारी, आधुनिक मस्त्यव्यवसायामध्ये मोठमोठ्या ट्रोलर्स चा आणि आधुनिक जाळ्यांचा वापर केला जातो.
३. मासेमारांना सातत्याने वेगवेगळ्या प्रकारच्या समस्याना सामोरे जावे लागते. यामध्ये निसर्गातील संकट त्याचबरोबर मस्त्यदुष्काळ ही एक महत्वाची समस्या असते.
४. १९६० नंतर मस्यव्यवसायामध्ये यांत्रिकीकरणाचा जास्त अवलंब झाल्यामुळे यांत्रिक बोटी ज्याठिकाणी मासे अंडी घालण्यासाठी येतात तेथे पर्सिनेट साख्या जाळ्याचा वापर करून ती अंडीच फुटल्यामुळे मस्यउत्पादनावर त्याचा परिणाम होतो. या संदर्भाचा विचार करून मी सदर शोधनिबंध पूर्ण केला आहे.



**संशोधनाची साधने :-**

**१. निरीक्षण :-**

मी प्रत्यक्षात निवडलेल्या गावामध्ये जाऊन त्या गावातील मासेमारी होणाऱ्या परिसराची पूर्णपणे केली. तसेच मच्छिमार कुटुंबाच्या वाडीमध्ये जाऊन त्याच्या त्या वाडीपरीसराची पाहणी केली आहे.

**२. मुलाखत :-**

या माध्यमातून संशोधकाने जि अभ्यासासाठी गावे निवडलेली होती त्या गावातील मासेमारी संदर्भातील जि प्रमुख मंडळी होती ती व्यावसायिक होती. मच्छिमार बांधव होते त्याच्यापैकी काही मंडळीशी त्याची चर्चा करून त्याची मुलाखत घेऊन त्याच बरोबर शासकीय अधिकारीची सुद्धा मुलाखत घेतलेली आहे.

**३. प्रश्नावली :-**

या शोधनिबंधासाठी मच्छिमार बांधावाकरिता स्वतंत्र प्रश्नावली तयार करून एकूण १२ प्रश्नावल्या भरून भरून घेतल्या आहेत. आणि त्याआधारे प्रकल्प अहवालाचे लिखाण केले आहे.

**४. दस्तऐवज**

यामध्ये देवगड तालुक्याच्या मासेमारी विभागाचे दस्तऐवज त्याचबरोबर इंटरनेटवर असलेली माहिती त्याचबरोबर वेगवेगळ्या लेखकांनी लिहिलेली पुस्तके यासाठी वाचन करून तसेच सिंधुदुर्ग जिल्हाचे लोकसंखेच्या सेन्सस यासाठी उपयोग केला जातो.

**सिंधुदुर्ग जिल्हा आणि देवगड तालुका-**

**१. सिंधुदुर्ग जिल्हाचे स्थान विस्तार, अक्षांस- रेखांश**

सिंधुदुर्ग जिल्हा हा कोकण विभागाच्या दक्षिणेकडील भागात येतो. सिंधुदुर्ग जिल्हाचे मुख्यालय ओरोस येथे आहे. सिंधदुर्ग जिल्ह्यात प्रामुख्याने ८ तालुके आहेत, सिंधुदुर्ग जिल्हाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे ५,२०७ चौरस किमी आहे. सिंधदुर्ग जिल्हाची एकूण लोकसंख्या ८,४८,८६८ एवढी आहे, सिंधुदुर्ग जिल्हाचे वार्षिक पर्जन्यमान सरासरी ३,२८७ मिली मीटर आहे.

**२. लोकसंख्या :-**

सिंधुदुर्ग जिल्हाची लोकसंख्या २०११ च्या जणगणणेनुसार सुमारे ८,४८,८६८ एवढी आहे.

**३. व्यवसाय :-**

सिंधुदुर्ग जिल्हाचे प्रमुख व्यवसाय म्हणजे पर्यटन मस्यव्यवसाय शेती आणि काजू उद्योग या व्यतरीक्त व्यतरीक्त येथील लाकडी खेळणी आणि निर्सार्गिक रबर उत्पादन देखील महत्त्वाचे आहे.

**४. शिक्षण :-**

सिंधदुर्ग जिल्हात जिल्हा परीषदेच्या प्राथमिक शाळा सुमारे १,४२१ आहेत्व खाजगी शाळा ४२ आहेत. तसेच माध्यमिक शिक्षणाकरिता सिंधदुर्ग जिल्हात हायस्कूल १८६ आहेत, तर विनाअनुदानित हायस्कूल २२ आहेत.

**५.सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मत्सव्यवसाय :-**

सिंधुदुर्ग जिल्हात मासेमारी हा एक प्रमुख व्यवसाय आहे, विशेषतः कोकण किनारपट्टीवर येथे विविध प्रकारचे असे आढळतात आणि पारंपारिक मासेमारी पद्धती आजही अपरल्या जातात. मात्र पावसाळ्यात काही कल मासेमारीवर बंदी असते, जि यांत्रिकी नौकांना लागू होते.

**सिंधुदुर्ग जिल्हातील मासेमारी संबंधित माहिती :-**

**प्रमुख व्यवसाय :-** सिंधुदुर्ग जिल्हात मासेमारी, पर्यटन आंबा काजू आणि फणस हे प्रमुख प्रकार आहेत.

मासेमारी प्रकारचे प्रकार :- पारंपारिक आणि आधुनिक पद्धती दोन्ही येथे वापरल्या जातात.

**मासेमारीची मुख्य ठिकाणे :-** सिंधुदुर्ग जिल्हातील वेंगुर्ले, मालवण कुडाळ देवगड यांसारखी ठिकाणे मासेमारीसाठी प्रसिद्ध आहेत.

**मासेमारी हंगाम :-** सिंधुदुर्ग जिल्हात मासेमारीचा हंगाम साधारणपणे ऑक्टोबर ते मे या दरम्यान असतो. तर पावसाळ्यात जून ते ऑगस्ट मासेमारी बंदी असते. सिंधुदुर्ग जिल्हात मासेमारी एक महत्त्वाचा व्यवसाय आहे आणि या व्यवसायात अनेक समस्या आणि संधी आहेत. शासनाने मासेमारी क्षेत्राला मदत करण्यासाठी अनेक योजना सुरु केल्या आहेत.


**भारतातील मत्सव्यवसायाचे स्वरूप :-** भारतातील मत्स्य व्यवसाय हा सागरी आणि अंतर्दशीय दोन्ही प्रकारचा असून त्यात मासेमारी, मत्स्यपालन आणि संबंधित प्रक्रिया यांचा समावेश आहे. हा व्यवसाय देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि अन्नसुरक्षित महत्त्वपूर्ण योगदान देतो.

**सागरी मस्यव्यवसाय :-**

भारताच्या लांब किनारपट्टीमुळे सागरी मत्सव्यवसाय खूप महत्त्वाचा आहे. त्यात विविध प्रकारचे मासे जसे कि, सर्दीन मिर्करेल तुना आणि इतर मासे मिळतात. या व्यवसायात मासे पकडणे प्रकिया करणे. आणि विक्री करणे याचा समावेश होतो यत किनारी आणि खोल समुद्रातील मासेमारी यांचा समावेश आहे, जेथे विविध प्रकारचे मासे, खेकडे आणि इतर सागरी प्राणी पकडले जातात.


**संशोधनातील मर्यादा:-**

- सिंधुदुर्ग मधील विशेषतः देवगड मधील मासेमारांच्या समस्या सूक्ष्म स्तरावर फारशा कोणी अभ्यासलेल्या नाही.
- माश्यांच्या सिंधुदुर्ग किनाऱ्यावरील कमी होत असलेल्या प्रजाती याकडे ही फारसे कोणी लक्ष दिलेलं आढळत नाही.





देवगड, मिठ्मुंबरी,मिठबाव,विजयदुर्ग ही मासेमारीची ठिकाणे अभ्यासासाठी निवडण्यात आली. देवगड मध्ये मासेमार तुलनेने जास्त आहेत.


**मासेमारांचे वयोगटानुसार विश्लेषण -**





मासेमारी करणाऱ्यांच्या वयोगटाचा आढावा घेतला असता असे दिसते की जवळपास निम्मे 48.57 % मच्छिमार हे 50 पेक्षा जास्त वय असलेले आहेत. तर 28.57% मासेमार हे 31 ते 40 वयोगटातील ,12.85 % मासेमार 41 ते 50 वयोगटातील तर केवळ 7 % मासेमार हे 20 ते 30 वयोगटातील आहेत. यावरून असे समजते की बऱ्याच मासेमारांना मासेमारीचा खूप अनुभव आहे.




मासेमारी करणाऱ्यांच्या शिक्षणाचा आढावा घेतला असता असे दिसते की जवळपास निम्मे 55.71 हे माध्यमिक शिक्षण घेत आहेत. तर 34.28 हे उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहेत .तर 8.57 हे पदवी चे शिक्षण घेतले आहेत. तर निरक्षर व प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या कमी आहे. या वरून असे कळते कि मासेमारीकरणाऱ्यांच्या शिक्षणामध्ये जास्त करून माधामिक शिक्षण घेणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे, असे कळून येते.





मासेमारी करणाऱ्या त्यांच्या व्यवसायातील अनुभवावरून असे दिसून येते कि जवळपास निम्म्या अधिक 50% मासेमार हे 15 वर्षा पेक्ष्या अधिक मासेमारी हा व्यवसाय करत आहेत . तर 18.57% मासेमार हे 11 ते 15 वर्ष्या पेक्ष्या अधिक मासेमारी हा व्यवसाय करत आहेत. 24.28% मासेमार हे 6 ते 10 वर्षा पेक्ष्या अधिक मासेमारी हा व्यवसाय करत आहेत. त्यानंतर 7.14% मासेमार हे 1 ते 5 वर्षा पेक्ष्या अधिक मासेमारी हा व्यवसाय करत आहेत. असे दिसून येते कि निम्म्या पेक्ष्या जास्त मासेमार हे 15 वर्षा पेक्ष्या अधिक मासेमारी व्यवसायात तरबेज आहे.





मासेमारी करणार्यांचे वार्षिक उत्पन्न हे 50 हजार पेक्ष्या कमी असताना 5 वर्षा पूर्वी हे उत्पन्न 37.14% होते तर अत्त हे उत्पन्न 11.43% वर आले आहे. मासेमारी करणार्यांचे वार्षिक उत्पन्न हे 50 हजार ते 1 लाखा पेक्ष्या कमी असताना 5 वर्षा पूर्वी हे उत्पन्न 3०% होते तर आत्ता हे उत्पन्न 30% वर आले आहे. तर हे 1 ते 1.5 लाखा पेक्ष्या कमी असताना 5 वर्षा पूर्वी हे उत्पन्न 7.14% होते तर आता हे उत्पन्न 22.86% वर आले आहे.


2 ते 2.5 लाखा पेक्ष्या कमी असताना 5 वर्षा पूर्वी हे उत्पन्न 2.86% होते तर आता हे उत्पन्न 7.14% वर आले आहे. 2.5 ते 3 लाखा पेक्ष्या कमी असताना 5 वर्षा पूर्वी हे उत्पन्न 12.86% होते तर आता हे उत्पन्न 4.28% वर आले आहे. 3 लाखा पेक्ष्या जास्त असताना 5 वर्षा पूर्वी हे उत्पन्न 10% होते तर आता हे उत्पन्न 5.71% वर आले आहे. वरील माहिती वरून असे दिसून येते कि मासेमारी करणार्यांमध्ये 5 वर्षा पूर्वी व आता या येणाऱ्या उत्पन्नात पूर्णपने भिन्नता आढळते .





मासेमारी करणाऱ्या नौकांच्या प्रकारामध्ये स्वतः च्या मालकीची बोट 10% आहे,तर स्वतःच्या मालकीची पात 50% आहे व होडी 44.29% आहेत. भाड्याच्या नौकांमध्ये बोटीची संख्या 5.71% आहे,तर पातींची संख्या 1.43 % आहे . त्यानंतर सामुदायिक मालकीची बोटींची सर्वात कमी असून टी केवळ 1.43% एवढी आहे .वरील आलेखानुसार असे दिसून येते कि स्वतःच्या मालकीची बोट, पात व होडीची संख्या सर्वात जास्त आहे तर सामुदायिक मालकीची बोटींची संख्या अत्यंत तुरळक प्रमाणात आहे.



मासेमारी करणाऱ्या नौकांवर समुद्रात 5पेक्ष्या कमी जाणारी स्थानिक माणसे 71.43% असतात, तर परप्रांतीय हे 18.57%माणसे जातात. तर 5ते 10मध्ये 4.28%जाणारे माणसे स्थानिक असतात. तसेच 10पेक्ष्या जास्त जाणारी माणसेही स्थानिकच असतात . तर वरच्या आलेखानुसार समुद्रात जाणाऱ्या स्थानिक व परप्रांतीय माणसांमध्ये भिन्नता दिसून येते.





वरील आलेखामध्ये दिसून येते कि समुद्रात नौकांवर काम करणारे मजूर 27.14%हे स्थानिक तांडेल असून 8.57%तांडेल परप्रांतीय आहेत. तर 80%स्थानिक मासे पकडणारे मजूर आहेत त्या पैकी स्थानिक मजूर हे सुमारे 80%असून परप्रांतीय मजूर हे 7.14%असून मासे पकडणारे आहेत. काम करणाऱ्या मजुरांमध्ये स्थानिक व परप्रांतीय मजुरांमध्ये विविधता आहे.





मासेमारी करताना वर्षाला येणारा खर्च हा 50हजार पेक्ष्या कमी असताना 5वर्षा पूर्वी येणारा खर्च हा 40.58%येवढा होता . तर आत्ता येणारा खर्च हा 66.67%आहे. 50हजार ते 1लाखा पेक्ष्या जास्त येणारा खर्च हा


5वर्षा पूर्वी 7.25%येवढा होता तर आत्ता हा खर्च 23.19%येवढा आहे. त्या नंतर 1.5लाख ते 2लाख पेक्ष्या जास्त येणारा खर्च हा 5वर्षा पूर्वी  निरंक आहे. तर आता येणारा खर्च हा सुमारे 7.25%एवढा आहे. 2लाख ते 2.5लाख पेक्ष्या जास्त येणारा खर्च हा 5वर्षा पूर्वी 13.4%येवढा असून साध्या चा खर्च हा 4.35%येवढा आहे. 2.5लाख ते 3लाख पेक्ष्या जास्त येणारा वर्षा चा खर्च हा 5वर्षा पूर्वी सुमारे 1०.14%येवढा असून सध्या चा खर्च हा निरंक आहे. 3लाख पेक्ष्या जास्त येणारा खर्च हा आता 18.84%येतो. वरील आलेख वरून असे दिसून येते कि मासेमारी करताना 5वर्षा पूर्वी येणारा खर्च व आता चा खर्च या मध्ये भिन्नता आढळते.




मासेमारीचा हंगाम हा वेगवेगळ्या प्रकारामध्ये येतो.जस कि सप्टेंबर ते नोव्हेंबर मध्ये 56.9%येवढा मासेमारीचा हंगाम असतो.तर डिसेंबर ते फेब्रुवारी मध्ये हा हंगाम 39.65%असतो. जून ते ऑगस्ट मध्ये मासेमारीचा हंगाम हा 2.59%येवढा असतो .तसच मार्च ते मे मध्ये हा हंगाम खूप कमी असून तो ०.86%येवढाच असतो. तसेच या आकृती मधून असे दिसून येते कि मासेमारीचा हंगाम हा वेगवेगळ्या महिन्या मध्ये दिसून येतो.





मासेमारी करताना बऱ्याच समस्या त्यांना जाणवून येतात त्यात मासे कमी होत आहेत, सागरी समस्या,परप्रांतीय नौकांची उलाढाल,लिलाव करण्याच्या ठिकाणी समस्या ह्या महत्वाच्या मासेमारी समस्या जाणवून येतात.





समुद्रा मधून येणाऱ्या माश्यांची निर्यात हि एका ठिकाणा वरून विविध ठिकाणी केली जाते. त्यात प्रामुख्याने मासे हे मुंबई व बेळगाव ला जास्त प्रमाणात जातात . मुंबईला 37.5%तर बेळगाव ला पण 37.5%एवडे मासे निर्यात होतात. तसेच गोवा ला हे मासे 20.14%एवडे मासे निर्यात होतात तर पुणे या ठिकाणी


4.86%मासे निर्यातीस जातात. वरील आलेखावरून समजून येते कि समुद्रामधील मासे हे वेगवेगळ्या ठिकाणी निर्यात होतात हे समजून येते.





मासेमारी पाठ्यामध्ये असणारया समस्या सोडवण्यासाठी पर्सिसेन जाळ्यांच्या वापरावर मर्यादा, मासेमारी सहकारी संस्थांमध्ये सामंजस्य, सरकारने योग्य अनुदाने द्यावीत, मासे अंडी घालतात त्या क्षेत्रात त्यावेळी कडक निर्बंध हे उपाय सुचवले आहेत.





पूर्वीची आणि आताची मासे उपलब्धता किंवा आढळ याबद्दल मासेमारांकडून माहिती घेतली असता असे आढळले की करकरा, पापलेट, बोय, तारली, ताडमासा, करली, मुशी, लांज, वाम, पाला, भिंग इ. मासे आता पूर्वीपेक्षा खूप कमी आढळतात, यातील काही प्रजाती दुर्मिळ होत चाललेल्या आहेत. तसेच तांबूस, काट बांगडा, हलवा, सुरमई, गेदर, कुप्पा इ. मास्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे.





मासेमारीला पूरक व्यवसाय करता का या आलेखानुसार आपणास असे दिसून येते कि 44.29 %लोक हे पूरक व्यवसाय करतात. तसेच 55.71 %लोक हे पूरक व्यवसाय करत नाही.





वरील आलेखावरून आसे असे दर्शिवले आहे कि मासेमारीला ला पूरक व्यवसाय कश्या व किती प्रमाणात करावे लागतात. त्यात शेती हा व्यवसाय 37%तर, महाराष्ट्र मध्ये मजुरी हि 13%लोक पूरक व्यवसाय म्हणून करतात. तसेच 17%लोक हे मासेमारी व्यवसायाबरोबर नोकरी हि करतात. यात महत्वाचा भाग म्हणजे मासेमारी बरोबर बागायत हा पूरक व्यवसाय करणारे लोक हे 33%इतके येतात.




मासेमारीतील समस्या पाहता मासेमारी बरोबरच अर्थार्जनासाठी काही पर्याय असले पाहिजेत या संदर्भात मासेमारांना विचारले असता मासे प्रक्रिया उद्योगास प्रोस्ताहन देणे सर्वाधिक गरजेचे आहे तसेच सागरी सागरी पर्यटन प्रोत्साहन, शाश्वत मासेमारी,मस्त्य शेतीस प्रोस्ताहन,त्यात नौकातून जल पर्यटन करणे,शोभिवंत मासे पैदास आणि पालन यांची देखील गरज आहे.




भविष्यात मासेमारी व्यवसाय समाधानी आहे कि नाही हे वरील आलेखावरून आपल्याला दर्शवलेले आहे. तर यामध्ये असमाधानी ते समाधानी पर्यंत 5 स्तरांमध्ये दाखवले आहे. पहिल्या स्तराला 7.14 %तर दुसरया स्तराला 8.57 %तिसरया स्तराला 30 %दाखवले आहे तसेच चौथ्या स्तराला 44.28 %आहे तर शेवटच्या व पाचव्या स्तराला 10 %समाधानी व्यवसाय आहे.




मासेमारी भवितव्यनुसार वरील आलेख दर्शवला आहे तर त्यात कमी पासून जास्त पर्यंत असे 5स्तर आहेत. पहिल्या स्तराला 11.43 %तर दुसर्या स्तराला 14.28 %तिसरया स्तराला 27.14 %तर चौथ्या स्तराला 30 %आणि शेवटच्या पाचव्या स्तराला 17.14 %इतके आहे.

## निष्कर्ष :-

- सिंधुदुर्ग पाट्यामध्ये प्रामुख्याणे देवगड बंदरावर मासेमारी जास्त होते.
- मासेमारी करणाऱ्यांच्या वयोगटात सर्वसाधारण 50पेक्ष्या जास्त वयोगटातील मासेमार मासेमारी करतात.
- मासेमारी करणाऱ्यांच्या शिक्षणाचा आढावा घेता माध्यमिक शिक्षण घेणारे सर्वसाधारण पणे जास्त दिसतात.
- मासेमारी व्यवसायातील अनुभव हा 15वर्षापेक्षा अधिक असणारे मासेमार हे बाकीच्यानपेक्षा निम्म्याहून अधिक आहे.

- **मासेमारी करणार्यांचे वार्षिक उत्पन्न हे** 5**वर्षापूर्वी** 50**हजार पेक्ष्या कमी होते ते आता** 2.5**ते** 3**लाख पेक्ष्या जास्त आहे**.
- **मासेमारी हंगाम हा बहुतांश रित्या सप्टेंबर ते नोव्हेंबर मध्ये जास्त असतो**.
- **मासेमारी संदर्भात जाणवणाऱ्या समस्यांमध्ये सागरी प्रदूषण हे जास्त आढळते**.
- **मासे निर्यात हे प्रामुख्याने मुंबई व बेळगाव या ठिकाणी मोठ्या प्रमाणात निर्यात होतात**.
- **मासेमार हे बहुतांश मासेमारीला पूरक असा व्यवसाय करतात**.
- **त्यात शेती आणि बागायत हा व्यवसाय जास्त करून निवडला जातो**.

## संदर्भ


- **AyappanS., Diwan A.D.(2006)** Fisheries Research and Development in India,Fishing chimes,Vol. 26 No. 1
- Metar. S. Y., Nirmale V. H, Gangan . S.S, Chogale, N.D. Pai, R. and Bhosale B.P. (2020) Traditional Knowledge In Bivalve fishery Of North Konkan Coast Of Maharashtra, India.**Journal of Indian Fisheries Association,** 47(1): 54 – 62
- Naik B. V., Patil S. V., Shirdhankar N. N., Yadav B. M., Tibile R. M., Chaudhari K. J., Wasave S. M. and Yewale V. G. (2020)Socio-Economic Profile of Shrimp Farmers of South Konkan Region, Maharashtra, India International Journal of Current Microbiology and Applied Sciences, ISSN : 2319, Vol. 9, No. 9